# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 19/06/2020 (शुक्रवार)
(सकाळ)

### जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 03 कि. मी अंतरावर सातगाव रिधोरा वार्ड क्र. 5, ता. हिंगणा, जि. नागपूर येथे दिनांक 18/06/2020 चे 18.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– नंदु नमुजी वाघमारे, वय 32 वर्ष, रा. वार्ड क्र. 4, सातगाव व आरोपी नामे– 1) सुरज किसनाजी तुमडाम, वय 28 वर्ष, 2) आकाश किसनाजी तुमडाम, वय 25 वर्ष, दोन्ही रा. सातगाव रिधोरा यांच्यात मागील एक वर्षापासुन शुल्लक कारणावरुन वाद झालेला होता. तेव्हापासुन त्यांचे आपसात पटत नव्हते. आरोपी हा फिर्यादीच्या घरासमोर जावून शिवीगाळ करीत होता. दरम्यान फिर्यादीच्या पत्नीने फिर्यादीला सांगीतले. यानंतर फिर्यादी हा आरोपीतांना समजविण्यास गेला असता आरोपीतांनी फिर्यादीशी वाद करुन जुन्या वादाच्या कारणावरुन संगणमत करुन फिर्यादीला खाली पाडून जिवानीशी ठार मारण्याचे इरादयाने त्याच्या डोक्यावर पावडयाचे पात्याकडील भागाने मारहाण करून गंभीर जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 307, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री. चौधरी 9158222709 हे करीत आहे.

### रेती चोरी करणाऱ्या आरोपी अटक

पो.स्टे. खापा :– अंतर्गत 07 किमी. अंतरावर मौजा वाकोडी फाटा येथे दिनांक 18/06/2020 चे 22.30 वा. दरम्यान एमच–40/एल–4237 क्रमांकाचा ट्रेक्टरचा व एमएच– 40/एल– 5584 क्रमांकाच्या ट्रालीचा चालक आरोपी नामे राजकुमार अण्णाजी चौधरी, वय 33 वर्ष, रा. वाकोडी याने त्याच्या ताब्यातील वाहनात विनापरवाना अवैधरित्या 1 ब्रास रेती किं. 2,000/– रू. रेती भरून वाहतुक करतांना मिळुन आला. वाहनासह एकुण 3,02,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे पोशि अंकुश शास्त्री यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहा. फौ. मुकुंदा लोंदे हे करीत आहे.

## दुखापत

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 15 कि. मी अंतरावर निमखेडा येथे दिनांक 18/06/2020 चे 17:08 वा. ते 18.27 वा. दरम्यान फिर्यादी नामे– त्रृषभ बंडुजी भुते, वय 24 वर्ष, रा. निमखेडा व आरोपी 1) राजु वैद्य हे एकमेकांच्या घरासमोर राहात असुन दोघांचेही घराच्या मधोमध सिमेंट रस्त्याचे बांधकाम सुरू आहे. सदर रस्त्याचे उतारावरून यातील आरोपीतांनी फिर्यादीचे घरासमोर दगड गाडला व ठेकेदाराने त्याचे सेंट्रिग ठोकल्याने फिर्यादीने सदर ब्रेकर मुळे पावसाचे पाणी आपले घरात जाईल असे वाटल्याने सेंट्रिगची पाटी काढली. त्यामुळे आरोपीतांनी संगणमत करून गैरकायदयाची मंडळी जमवुन क्र. 1, 2) कैलास वैद्य 3) कल्पेश वैद्य 4) आदेश वैद्य 5) आषीश वैद्य सर्व रा. निमखेडा यांनी संगनमत करून फिर्यादीचे भावास प्राणघातक शस्त्र सब्बलीने डोक्यावर मारून जबर दुखापत केली. तसेच आरोपीतांनी फिर्यादीचे वडीलास पावडयाने खांदयावर मारले व फिर्यादीस हातबुक्कीने मारहाण करून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 323, 326, 143, 147, 148 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार सदाशिवीव काटे 9011326793 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर